
## थोडक्यात




### भरधाव पीएमपीएमएल बस गायींच्या कळपात घुसली

**खेड शिवापूर (आरंभ पर्व) :** पीएमपीएमल बसने गिर जातीच्या गाईंच्या कळपाला चिरडल्याची घटना घडली आहे. या अपघातात दोन गाई दगावल्या असून, इतर गायी या गंभीर जखमी झाल्या आहेत. ही घटना कोंढणपूर परिसरात आज सकाळी पावणेसात वाजण्याच्या सुमारास घडली आहे. याबाबत मिळालेल्या अधिक माहितीनुसार, कोंढणपूर ते अवसरवाडी ही पीएमपीएमएल बस कोंढणपूर येथून आज सकाळी पावणेसात वाजता पुण्याकडे निघाली होती. याचवेळी सकाळी सहा वाजून पन्नास मिनिटांनी कोंढणपूर रस्त्यावरील सागराची ताल येथे हा गीर गाईंचा कळप चरण्यासाठी रानात निघाल्या होत्या. गायींचे मालक तुकाराम नामदेव मुजुमले हे असून गायींच्या मागे एक कामगार होता. दरम्यान, भरधाव पीएमपीएमल बस गाईंच्या कळपात घुसल्याने अपघात झाला या अपघातात दोन गाई दगावल्या असून, इतर गाई गंभीर जखमी झाल्या आहेत. काही गाईंचे पाय मोडले आहेत, तर काहींचे पायाचे पंजे तुटून पडले आहेत. एका गायीचे शिंग तुटलेले दिसून आले. यामधील काही गायी गाभण असल्याचे अजय मुजूमले यांनी सांगितले. या घटनेची माहिती मिळताच राजगड पोलीस ठाण्याचे नवनाथ राठोड हे घटनास्थळी दाखल झाले असून तपासणी सुरू आहे.

### लैंगिक अत्याचार करून तिला त्रास देणाऱ्या तरुणाचा शोध सुरू



**नवी मुंबई (आरंभ पर्व) :** उलवे भागात राहणाऱ्या सुहास खंडू जोगदंड (28) या तरूणाने 27 वर्षीय तरुणी सोबत प्रेमसंबंध निर्माण करून दारूच्या नशेत जबरदस्तीने तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. पीडित तरुणीचे दुसऱ्या तरुणासोबत लग्न ठरवल्यानंतर आरोपी सुहास याने त्याच्यासोबत असलेले पीडित तरुणीचे खाजगी व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देऊन तिला त्रास देण्यास सुरुवात केल्याने पीडित तरुणीने पोलिसांकडे धाव घेतली. वाशी पोलिसांनी या आरोपी तरुणाविरोधात बलात्कारासह विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरु केला आहे. या प्रकरणातील 27 वर्षीय पीडित तरुणी मुंबईतील वडाळा भागात राहण्यास असून तिच्यावर लैंगिक अत्याचार करणारा आरोपी सुहास खंडू जोगंदड हा उलवे परिसरात राहण्यास आहे. 2017 मध्ये हे दोघेही एकत्र कामाला असताना त्यांच्यामध्ये मैत्री झाली होती. त्यानंतर त्यांच्यामध्ये प्रेमसंबंध निर्माण झाल्यानंतर आरोपी सुहास जोगदंड याने पीडित तरुणीला दारू पाजली. त्यावेळी पीडित तरुणीला नशेत असताना त्याने वाशीतील संकल्प लॉजवर नेऊन तिच्यावर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केले. त्यानंतर देखील आरोपी सुहास जोगदंड याने पीडित तरुणीवर विविध ठिकाणी जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केले. दरम्यान, पीडित तरुणीने आरोपी सुहास सोबत असलेले प्रेमसंबंध तोडून दुसऱ्या तरुणासोबत विवाहाची तयारी केल्यानंतर आरोपी सुहास याने पीडित तरुणीला दोघांचे खाजगी व्हिडीओ पाठवण्याची धमकी देऊन तिला शारीरिक व मानसिक त्रास देण्यास सुरुवात केली. पीडित तरुणीने आरोपी सुहासला प्रतिसाद न दिल्याने सुहासने 5 जानेवारी रोजी पीडित तरुणी राहत असलेल्या घरासमोर जाऊन तिचे खाजगी व्हिडीओ सर्वांना पाठवण्याची धमकी दिली. तसेच त्याच्यासोबत राहण्यासाठी जबरदस्ती केली; अन्यथा तिचा जीव घेण्याची धमकी दिली. या प्रकारामुळे त्रस्त झालेल्या पीडित तरुणीने वडाळा टीटी पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. त्यानुसार, वडाळा टीटी पोलिसांनी आरोपी सुहास जोगदंड याच्याविरोधात बलात्कारासह धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. तसेच हा गुन्हा पुढील तपासासाठी वाशी पोलिसांकडे वर्ग केला आहे. त्यानुसार, या गुन्ह्याचां पुढील तपास वाशी पोलिसांकडून सुरु करण्यात आला आहे.

# सुचिता हरपळे यांना पुरस्कार जाहीर

## "सन्मान नारी शक्तीचा 2025" या जिल्हास्तरीय पुरस्काराने होणार सन्मान!



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण या मानवाच्या मूलभूत गरजा आहेत. या सर्व गरजांमुळे समाज उज्वल दिशेने पोहोचतोच पण त्याचबरोबर जर मानवाला शिक्षण मिळाले तर तो त्याचे उज्वल भवितव्य स्व हस्ते घडवू शकतो. आपल्या आजूबाजूला अनेक जण असे आहेत की ते स्वतःपुरता शिकत असतात परंतु स्वतः शिक्षण घेऊन इतरांसाठी ज्ञानाचा दिवा प्रज्वलित ठेवणे हे खूप कमी जणांना जमतं.

सौ. सुचिता राहुल हरपळे यांनी स्व कष्टावर, प्रगल्भ बुद्धीच्या जोरावर आतापर्यंत समाजात विविध स्तरावर समाजकार्य केले आहे.

सुचिता हरपळे गेल्या अनेक वर्षापासून न्यूज प्रहार साप्ताहिकाचे संपादकीय पद देखील भूषवत आहेत.

समाजामध्ये घडणाऱ्या महिलांचे शोषण, महिलांवर होणारे अन्याय, महिला साक्षरता, महिला सबलीकरण यासारख्या अनेक महत्त्वाच्या विषयावर नेहमी लेखन करत असतात. लेखणीच्या माध्यमातून महिलांचा उत्कर्ष कसा होईल याचा सातत्याने विचार देखील करत असतात, म्हणूनच पुणे शहर जिल्हा शिक्षक काँग्रेसच्या वतीने सुचिता राहुल हरपळे यांना "सन्मान नारी शक्तीचा क्रांतिज्योती सावित्री बई फुले, माता रमाई आंबेडकर, अहिल्याबाई होळकर, राजमाता जिजाऊंच्या लेकींचा" या जिल्हास्तरीय पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे.

मिळणाऱ्या या पुरस्कारामुळे समाजातील सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस शिक्षण कमिटी आणि पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटी यांच्या सोबत माननीय सुचिता हरपळे स्त्रियांच्या सबलीकरणासाठी व सक्षमीकरणासाठी नेहमीच तत्पर असतात.

समाजातील दीनदुबळ्या स्त्रियांच्या हक्कासाठी नेहमी अग्रेसर असतात. यंदाचा मिळालेला पुरस्कार हा खऱ्या अर्थाने सावित्री, माता रमाई चा पुरस्कार आहे असे देखील म्हटले जात आहे.

श्री विजय कचरे, श्री रामप्रभू पेटकर, श्री यशराजजी पारखी यांनी सुचिता हरपळे यांना भविष्यातील शैक्षणिक आणि सामाजिक वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा दिल्या.

# राहुल गांधींना पुणे कोर्टाकिडून जामीन मंजूर



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी वादग्रस्त विधान केल्याप्रकरणी लोकसभेचे विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांना पुण्यातील विशेष न्यायालयाने शुक्रवारी जामीन मंजूर केला आहे. या खटल्याच्या सुनावणीसाठी राहूल गांधींनी उपस्थित रहावे यासाठी त्यांना न्यायालयाकडून वारंवार समन्स बजावण्यात आले होते. अखेर आज राहुल गांधी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे न्यायालयात हजर झाले होते. त्यानंतर पुणे सत्र न्यायालयाने राहुल गांधी यांना जामीन मंजुर केला आहे. या खटल्याची पुढची सुनावणी 18 फेब्रुवारी रोजी होणार आहे. खासदार-आमदारांविरोधातील दाव्यांची सुनावणी घेणाऱ्या विशेष न्यायाधीश अमोल शिंदे यांच्या न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी सुरु आहे. राहुल गांधी यांना हजर राहण्याबाबत शुक्रवारी (10 जानेवारी) तारीख देण्यात आली होती. त्यानुसार राहुल गांधी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे न्यायालयासमोर हजर झाले. दरम्यान, राहुल गांधी आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबद्दलच्या वक्तव्याचा वाद सातत्याने माध्यमांत झळकतो. राहुल गांधींनी माफीवीर असे म्हणत सावरकर यांचा अवमान केल्याचा आरोप करत भाजपने राहुल गांधींविरुद्ध आंदोलनही केले होते. तर, भारत जोडो यात्रेतही त्यांनी सावरकरांचे नाव घेतल्याने वाद निर्माण झाला होता. याप्रकरणी राहुल गांधींना पुण्यातील शिवाजीनगर न्यायालायात 19 ऑगस्ट रोजी हजर राहण्याचे आदेश देण्यात आले होते. याप्रकरणी गांधी यांनी न्यायालयात येऊन त्यांची बाजू मांडावी, असे न्यायालयाने म्हटले होते. मात्र, राहुल गांधी अनुपस्थितीत राहिल्यामुळे कोर्टाने त्यांना समन्स बजावत पुन्हा न्यायालयात उपस्थित राहण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार त्यांनी आज ऑनलाईन उपस्थिती दर्शवत आपली बाजू मांडली आहे.

# मैत्रिणीला आयफोन गिफ्ट देण्यासाठी घरफोडी

**नागपूर (दै. आरंभ पर्व)**
मैत्रिणीला आयफोन गिफ्ट देण्यासाठी घरफोडी करणाऱ्या दोन विधिसंघर्षग्रस्त बालकांना पोलिसांनी ताब्यात घेतले. ही घटना कळमना हद्दीत घडली. पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा अवघ्या चोवीस तासांत उघड केला आहे. दिघेश्वर किसनलाल रहांगडाले (36, रा. कामनानगर, कामठी रोड), असे फिर्यादीचे नाव आहे. सोमवार, 6 जानेवारी रोजी दुपारी 3 ते बुधवार, 8 जानेवारी रोजी दुपारी 12.30 यादरम्यान दिघेश्वर रहांगडाले हे त्यांच्या राहत्या घराला कुलूप लावून परिवारासह सासऱ्याच्या गावाला गेले होते. यादरम्यान अज्ञात आरोपींनी त्यांच्या घराच्या मुख्य दाराचे कडी-कोयंडा कुलूप तोडून आत प्रवेश केला. यानंतर आरोपींनी बेडरूममधील कपाटात ठेवलेले रोख 1 लाख 44 हजार रुपये चोरून नेले, अशी तक्रार फिर्यादी दिघेश्वर यांनी दिली होती. या तक्रारीवरून कळमना पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. तपासादरम्यान कळमना पोलिसांच्या तपास पथकाने पेट्रोलिंगदरम्यान संशयितरीत्या रात्रीच्या वेळी फिरणाऱ्या दोन विधिसंघर्षग्रस्त बालक यांना ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली. विधिसंघर्षग्रस्त बालकांच्या ताब्यातून रोख रकमेपैकी 1 लाख 43 हजार 240 रुपये रोख जप्त करण्यात आले.

# प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणार




**यवत (दै. आरंभ पर्व)**
दौंड परिसरातील पायाभूत सुविधांसह अन्य प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. विद्या प्रतिष्ठानच्यावतीने 7 एकर परिसरात सीबीएसईची शाळा उभारून परिसरातील विद्यार्थ्यांकरीता दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्यात येईल, असेही ते म्हणाले. दौंड विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या बहूद्देशीय नूतन इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रा. दिगंबर दुर्गाडे, संचालक रमेश थोरात, दौंड शुगर प्रा. लि. चे संचालक वीरधवल जगदाळे, तहसीलदार अरूण शेलार, उपविभागीय पोलीस अधिकारी बापूराव तडस, गट विकास अधिकारी प्रशांत काळे, दौंड विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या अध्यक्षा वैशाली जगदाळे, उपाध्यक्षा अलका काटे, संचालक मंडळ, लिंगाळीचे सरपंच सुनील जगदाळे तसेच विविध क्षेत्रातील पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना पवार म्हणाले, 1960 साली स्थापन करण्यात आलेल्या दौंड विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेने 1 कोटी 95 लाख रुपये खर्चून ही परिसराच्या वैभवात भर घालणारी इमारत उभारली आहे. सेवा सहकारी संस्था ही संबंधित गावाची नाडी असते. संचालक मंडळांनी संस्थेचा कारभार पारदर्शक पद्धतीने करावा, चुकीच्या पद्धतीने काम करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल. सर्वांनी मिळून सहकार चळवळ टिकविण्यासाठी प्रयत्न करू, त्यासाठी आवश्यकतेनुसार सुधारणा करण्यात येतील, असं अजित पवार यावेळी म्हणाले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशात 3 कोटी घरे बांधण्याचे उद्दिष्ट निश्चित केले असून त्यापैकी राज्यात 35 लाख घरे बांधण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. राज्याच्या अर्थसंकल्पात 3, 5 आणि 7. 5 एचपीपर्यंतच्या कृषीपंपांची वीज माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. 'माझी लाडकी बहीण' योजनेकरीता तालुक्यातील महिलांच्या खात्यात 70 कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत.

# 'अंबर तारा'तर्फे साड्यांचे 'जय हो' विशेष कलेक्शन सादर



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
नमिता काळभोर यांनी स्थापन केलेल्या व परंपरा व अभिनवता यांचा संगम साधणाऱ्या 'अंबर तारा' या प्रसिध्द भारतीय डिझायनर लेबलतर्फे प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने येथे 'जय हो' साड्यांचे खास कलेक्शन सादर करण्यात आले आहे. प्रजासत्ताक दिनासाठीचा हा खास संग्रह अभिजातता आणि देशभक्तीचे प्रतीक असलेल्या डिझायनर साड्यांच्या अप्रतिम श्रेणींद्वारे भारताच्या सांस्कृतिक वारसा आणि समकालीन भावनेला आदरांजली अर्पण करतो.

या कलेक्शनमध्ये भारताचा अभिमान आणि एकात्मता दर्शविण्यासाठी डिझाईन करण्यात आलेल्या सुझानी फ्लोरल तिरंगा साडी, तिरंगा साडी आणि मारीगोल्ड तिरंगा साडी अशा तीन उत्कृष्ट साड्यांचा समावेश आहे. बारीक डिझाईन, कलाकुसर आणि तिरंग्याच्या रंगछटांचे परिपूर्ण मिलाफ असलेले 'जय हो' कलेक्शन भारताचे गुणवैशिष्ट्य अचूक प्रतित करतेच, परंतु आधुनिक पिढीशी तादात्म्यही साधते.

या कलेक्शनबाबत अधिक माहिती देताना 'अंबर तारा'च्या संस्थापक व डिझायनर नमिता काळभोर म्हणाल्या की, हे 'जय हो' कलेक्शन भारताच्या परंपरेला अर्पण केलेल्या आदरांजलींहून खूप काही अधिक असून जागरूक आणि सशक्त भविष्याच्या दिशेने टाकलेले एक पाऊल आहे. अंबर तारा येथे आमच्या डिझाईनच्या प्रत्येक रचनांच्या पैलूला प्रेरणा देणाऱ्या महिलांचे सामर्थ्य आणि सर्जनशीलता साजरी करतो. फॅशन आणि संस्कृतीसाठी उद्याच्या उज्वल भविष्याची कल्पना करताना हे कलेक्शन भारताच्या उत्साहपूर्ण भावनेचा सन्मान करणारे आहे.

जय हो सुझनानी फ्लोरल ट्रायकलर साडी ही भारताच्या भावनेप्रती आदरांजली अर्पण करणारी आहे. शांतता आणि विकास दर्शविणारा या साडीचा पोत आणि प्रतीकात्मक रंगांसह भारताच्या उत्कृष्टतेचा नमुना प्रतिबिंबित करते.

लग्न समारंभ सांस्कृतिक कार्यक्रम किंवा इतर समारंभांसाठी अनुरूप ही साडी परंपरा आणि आधुनिक अभिजातता यांचा मिलाफ आहे.हा प्रजासत्ताक दिन 'अंबर तारा'च्या कलेक्शनसह साजरा करूयात भारताचा वारसा. अधिक माहितीसाठी <https://ambartaara.com> या संकेतस्थळाला भेट द्या किंवा <https://www.instagram.com/ambar_taara/> या पेजला फॉलो करा.

# राजकवी भा. रा. तांबे यांच्या 151व्या जयंती वर्षाच्या निमित्त विशेष उपक्रमाचे आयोजन

## 'मधु मागसि माझ्या' कार्यक्रमातून कविवर्य भा. रा. तांबे यांना आदरांजली




**पुणे (दै. आरंभ पर्व)**
आधुनिक मराठीतील गीत काव्यांचे प्रवर्तक मानले जाणारे व दीड शतकाहून अधिक काळ आपल्या अजरामर कवितांनी मराठी मनावर राज्य करणारे, राजकवी भा.रा.तांबे (भास्कर रामचंद्र तांबे) यांच्या 151 व्या जयंती वर्षानिमित्त 2025 मध्ये महाराष्ट्रात विविध उपक्रमांचे आयोजन करण्याचा मानस असल्याची माहिती तांबे कुटुंबियांच्या वतीने भा. रा. तांबे यांचे नातू शिरीष तांबे यांनी दिली.

यावेळी बोलताना ते म्हणाले की, माझ्या आजोबांचे संपूर्ण आयुष्य मध्य प्रदेशात व्यतीत झाले. पण त्यांनी लिहिलेल्या काव्यगीतांवर मराठी भाषिकांनी अतिशय अलौकिक प्रेम केले. त्यांच्या कवितांनी केवळ राज्याच्याच नव्हे तर देशाच्याही सीमा ओलांडल्याने त्यांचा नावलौकिक सर्वदूर झाला. त्यांच्या काव्य-गीतांबद्दल अनेक थोर साहित्यिक, समीक्षकांनी लिहिले आहे. अनेक उत्कृष्ट संगीतकार जसे गजाननराव वाटवे, वसंत प्रभू, पं. हृदयनाथ मंगेशकर, दशरथ पुजारी, राम फाटक यांच्यासह कमलाकर भागवत, श्रीधर फडके यांनी कविवर्यांच्या गीतांना संगीतबद्ध केले आणि गायक गजाननराव वाटवे, पं. कुमार गंधर्व, सुधीर फडके, भारतरत्न लता मंगेशकर, चिरतरुण आवाज असलेल्या आशा भोसले, मंदाकिनी पांडे, माणिक वर्मा यांनी त्यांची गीते गायलेली आहेत, जी आज इतकी वर्षे उलटल्यानंतरही मराठी रसिकांच्या हृदयात ताजी आहेत. म्हणूनच ती पुन्हा-पुन्हा गायली-ऐकली जातात, काना-मनात रुंजी घालतात. आजोबांना मराठी भावगीतांचे जनक असे कौतुकाने संबोधण्यात येते. राजकवीचा सन्मान मिळण्यापूर्वी भा. रा. तांबे यांनी मध्य भारतात विविध मानाच्या पदांवर काम केलेलं होतं. देवास, इंदूर येथे युवराज शिक्षक, पिपलोदा संस्थानचे दिवाण, शोपूर संस्थानिकाचे राजकीय सल्लागार, प्रतापगढ संस्थानचे पोलीस सुपरिंटेंडन्ट आणि न्यायाधीश, ग्वाल्हेर शिक्षण खात्यात रजिस्ट्रार अशा जबाबदारीच्या व महत्वाच्या पदांवर त्यांनी काम केले. त्यांच्या ठिकाणी असलेल्या प्रशासकीय कौशल्य व कार्यक्षमतेने ते एक कुशल व कणखर अधिकारी म्हणूनही ओळखले जात. काव्यास विशेष अनुकूल नसणाऱ्या व्यवसायांतही तांबे यांचा काव्यलेखनाचा छंद कायम राहिला. 1937 मध्ये ग्वाल्हेर संस्थानाने त्यांचा राजकवी म्हणून बहुमान केला. त्यांचा कार्यकाळ मध्य प्रदेशातच गेल्यामुळे तिथल्या राज्य शासनातर्फे आजही त्यांच्या नावे विविध पुरस्कार, सन्मान दिले जातात. शिवाय ग्वाल्हेरसह अनेक महत्वाच्या शहरांमध्ये तांबे प्रेमी अभ्यास मंडळे कार्यरत आहेत.

ही पार्श्वभूमी लक्षात घेता महाराष्ट्रासारख्या मराठी भाषिक राज्यात मध्य प्रदेशाप्रमाणेच काही उपक्रम हाती घेता यावे अशा हेतूने सुरुवात म्हणून कविवर्य भा. रा. तांबे यांच्या 151 व्या जयंती वर्षाच्या निमित्ताने पुणे आणि मुंबईचे रहिवासी असलेल्या तांबे कुटुंबीयांतर्फे येत्या 10 जानेवारी रोजी पुण्यातल्या ज्योत्स्ना भोळे सभागृहात संध्याकाळी 4:30 ते 8:00 या वेळेत 'मधु मागसि माझ्या' हा आदरांजली कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम तीन भागात होणार आहे. प्रारंभी तांब्यांचे हस्तलिखित, त्यांना मिळालेला राजकवी पुरस्कार तसेच निवडक मानपत्रं आणि तत्कालीन छायाचित्रांचे छोटेसे प्रदर्शन आयोजित केले जाणार आहे. त्यानंतर कार्यक्रमाचे औपचारिक उदघाटन होईल. याप्रसंगी प्रसिद्ध कवियित्री व समीक्षक प्रा. नीलिमा गुंडी या प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित राहतील. ज्येष्ठ भावकवी आणि संत साहित्यिक श्री. वि. ग. सातपुते हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. तर तिसऱ्या भागात सृजनस्नेही पुणे निर्मित आणि सुधीर मोघे प्रस्तुत 'स्मरण राजकवींचे' हा भा. रा. तांबे यांच्या निवडक काव्य-गीतांवर आधारित कार्यक्रम सादर होणार आहे. कार्यक्रमाचे निवेदन नीरजा आपटे या करतील. या कार्यक्रमासाठी साहित्य, संगीत क्षेत्रातल्या मान्यवरांना आमंत्रित करण्यात येत आहे.

संपर्क: शिरीष तांबे
:- 9870001744